जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर-37/2021

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

दिनांकः- 10.03.2021

**दि. 12.03.2021 रोजी आयोजीत करण्यात आलेली मनपाकेची ONLINE व्दारे घेण्यात येणारी सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका**

**आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव**

**विषय क्रं. 01**

**विषय :-** नांदेड शहरात वाहतुक सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने JNNURM योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या रस्ता रुंदीच्या वापरमध्ये बदल करुन उपाय योजना करणे बाबत

**संदर्भ :-** 1) मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 271 दिनांक 14.02.2019

2) मा. पालकमंत्री नांदेड जिल्हा यांचे दिनांक 23.01.2021 च्या बैठकीतील आदेश

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 271 दिनांक 14.02.2019 अन्वये JNNURM योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या रस्त्यामधील MUZ (Parking चा भाग) मुख्य रस्त्यास जोडल्यास रस्त्याची रुंदी वाढुन वाहतुकिस होणारा अडथळा दूर होवून वाहतुक कोंडी होणार नसल्यामुळे MUZ काढूण रस्त्याची राफंदी वाढविण्यास मान्यता प्राप्त झालेली आहे.

मा. पालकमंत्री नांदेड जिल्हा यांनी वाहतुकिची कोंडी कमी होण्याच्या दृष्टीने तरोडा नाका ते वजिराबाद चौक या रस्त्यावरील MUZ काढू रस्त्याची रुंदी वाढविण्याचे आदेशीत केले आहे.

तरोडा नाका ते म. फुले चौक आय.टी.आय. पर्यंतचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित झाल्यामुळे रस्त्याच्या भागाचे काम हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून होणे अपेक्षीत आहे.

आय.टी.आय. ते वजिराबाद चौकापर्यंतच्या रस्त्याची रुंदी वाढविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. आय.टी.आय. ते शिवाजीनगर पूलापर्यंत दोन्ही बाजू व कलामंदिर ते वजिराबाद चौक डावी बाजू पर्यंतच्या भागात खालील प्रमाणे करावयाच्या कामातील समाविष्ट बाबी आहेत.

अ) MUZ मधील पेव्हर ब्लॉक काढून सी.सी. करणे

ब) Curb Stone काढून सी.सी. करणे.

क) झाड व झाडासाठीचा भाग काढून सी.सी. करणे.

ड) रस्त्सयावरील Singes काढणे व नव्याने लावणे.

इ) विधुत पोल काढणे व आवश्यक ठिकाणी लावणे.

ई) झाडे लावणे.

उ) डिव्हायडरची रंगरंगोटी करणे

ऊ) Thermoplastic Paint चे पट्टे मारणे

उपरोक्त बाबीचा समावेश करुन राज्यदरसुची SSR 2020-21 प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यांची अंदाजपत्रकीय किमंत रुपये 3.25 कोटी इतकी होत आहे.

आय.टी.आय. ते शिवाजीनगर पूला पर्यंत दोनही बाजू व कलामंदिर ते वजिराबाद चौक डावीबाजू पर्यंतच्या भागात वाहतूक सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने JNNURM योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या रस्ता रुंदीच्या वापरमध्ये बदल करुन उपाय योजना करणेसाठीच्या कामास लागणारा खर्च रुपये 3.25 कोटी यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.

**स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना**

**विषय क्रं. 02** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत असलेले कर्मचारी श्री रुपेश विठ्ठलरान सरोदे, पुरुष मजुर (प्रभारी स्वच्छता निरीक्षक) या पदावर कार्यरत असुन त्यांचे वृध्द आईची तब्ये वारंवार बिघडत असुन उपचारासाठी संबंधीतास वारंवार पुणे येथे जावे लागत असुन संबंधीतांचे संपूर्ण कुटूंब हे पुणे येथे वास्तव्यास असल्यामुळे सबंधीतांनी पुणे महापालिका येथे सेवा वर्ग करण्याची विनंती केली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण नियम – 2008 मधील 06 अन्वये एका महापालिकेतुन

बदलीने नियुक्तीसाठी अर्ज केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार व दोन्ही महापािलकांतील नियुक्ती प्राधिका-यांच्या परस्पर समंती मान्य होतील अशा अटी व शर्तीवर खालील बाबींच्या अधीन राहुन बदलीची नियुक्ती देता येईल.

अ) पदोन्नतीचे भरण्यात येणा-या पदावर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही. फक्त नामनिर्देशनने नियुक्ती करिता राखून ठेवण्यात आलेलया रिक्त पदावर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.

ब) अशी नियुक्ती झाल्यानंतर त्या पद धारकांची जेष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ राहील.

ज्या दिनांकास संबंधीत हे पुणे महापालिकेत रुजु होईल तो दिनांक त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ राहील व संबंधीताचे वेतन संरक्षित करुन सेवा समायोजित करुन त्यांचे कुटूंब निवृत्ती वेतनासाठी पेन्शन कार्यवाही ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका त्यांच्या रुजु दिनांकापासून ग्राहय धरण्यात येईल या अटीवर त्यांची पदस्थापना करण्यास हरकत नाही.

उपरोक्त अटी व शर्ती अधीन राहून श्री रुपेश विठ्ठल सरोदे, प्रभारी स्वच्छता निरीक्षक यांना पूणे महापालिकेत सामावुन घेण्यासाठी पत्रव्यवहार करुन पुढील वैधानिक कार्यवाही मनपा प्रशासनाने करावी सदरचा ठराव या सभेमध्ये ठेवुन कायम करण्यात यावा.

**सुचक**:- अब्दुल सत्तार अब्दुल गफुर **अनुमोदक** :- विरेंद्रसिंघ गाडीवाले

**विषय क्रं. 03** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत मंजूर विकास आराखडयातील झोन मधील आरक्षण क्रमांक 02 व 03 संपादन करणे बाबत.

**सुचक** :- अब्दुल अलीम खान **अनुमोदक** :- ज्योती सुभाष रायबोले, संदीप सोनकांबळे

**विषय क्रं. 04** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नविन विकास नियंत्रक नियमावली लागू करणे व त्यामुळे मनपाकेचा उत्पन्नात होणारे परिणाम बाबत चर्चा करुन निर्णय घेणे.

**सुचक** :- विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- ज्योती सुभाष रायबोले

**विषय क्रं. 05** **प्रस्ताव**

महाराष्ट्र शासना तर्फे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस रुपये 50.00 कोटी मंजुर अनुदानित होणा-या कामाबाबत.

**सुचक** :- विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- बापुराव गजभारे

**विषय क्रं. 06** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत गुंठेवारी अंतर्गत दिनांक 31.12.2020 पर्यंतची बांधकाम नियमीत करणे बाबत.

**सुचक** :- विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- बापुराव गजभारे

**विषय क्रं. 07** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत शासनाच्या योजने अंतर्गत आयुष्य दवाखाना नविन इमारत बांधून चालु करणे बाबत.

**सुचक**:- अमिसिंह तेहरा **अनुमोदक** :- विरेंद्रसिंघ गाडीवाले

**विषय क्रं. 08** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 208 दि. 23.02.2007 अन्वये श्री संघरत्न गणपतराव सोनसळे यांची नियुक्ती उप अभियंता या पदावर पद उपलब्ध होणे, रिक्त होणे किंवा पदनिर्मिती होणे या पैकी पद रिक्त झाल्यास कायम स्वरुपी पदावर नियुक्ती देण्याचे ठरले होते. त्यानुसार ते महापालिकेत कंत्राटी तत्वावर एकत्रीत वेतनावर रुजु झाले त्याचे सोबतचे इतर कंत्राटी अभियंते पद रिक्त होताच त्यांना कायम स्वरुपी नेमणुका देण्यात आल्या.

श्री संघरत्न गणपतराव सोनसळे यांची वरील अभियंत्या सोबत नियुक्ती झाली. तथापी आजपावेतो त्यांना पद रिक्त झाल्यानंतर सुध्दा सेवेत कायमस्वरुपी नेमणुक दिलेली नाही. त्यामुळे त्यांच्यावर कठोर अन्याय झालेला आहे. आजमितीस अभियंता आस्थापनेवर एकूण 06 पदेमुळे असुन त्यापैकी एकुण 04 उप अभियंता या अभिनामाची पदे रिक्त आहेत. नविन सेवा प्रवेश नियमास आज पर्यंत शासनाची मान्यता प्राप्त झालेली नाही. जोपर्यंत शासनाची मान्यता मिळत नाही तोपर्यंत जुन्या सेवाप्रवेश नियमाप्रमाणे पदे भरण्याची कार्यवाही करावी असा नियम आहे. जुन्या सेवा प्रवेश नियमाप्रमाणे 50% पदे पदोन्नतीने व 50% पदे सरळसेवा भरतीने भरण्याची तरतुद आहे. दोन पदे सरळसेवा भरती नुसार भरता येतील परंतु आस्थापना विभागाकडून चुकिची माहिती दर्शवुन सर्व पदे पदोन्नतीचे आहेत हे विधान चुकीचे व दिशाभुल करणारे आहे. श्री सोनसळे यांनी मनपाकेस वारंवार कायम करण्यासाठी विनंती अर्ज केले परंतु मनपा आस्थपपनाने त्यांना दोन ओळीचे उत्तर सुध्दा दिले नाही त्यामुळे ते कायम होतील या आशेवर आज पर्यंत नौकरीत राहीले. आज ते वयोमर्यादेनुसार इतर ठिकाणी नोकरीस अपात्र झाले आहेत.

नांदेड वाघाळाशहर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्रं. 118 दिनांक 03.03.2021 अन्वये श्री संघरत्न गणपतराव सोनसळे यांना आस्थापनेवर रिक्त जागेवर कायमस्वरुपी उपअभियंता या पदावर सेवेत सामावून घेण्याचा ठराव एक मताने समंती दिली आहे.

श्री संघरत्न गणपतराव सोनसळे यांचेवर झालेला अन्याय दुर व्हावा त्यांची प्रदिर्घ सेवेचा, अनुभवाचा व उच्च शिक्षणाचा विचार करुन हि सर्वसाधारण सभा त्यांना सेवेत कायमस्वरुपी करण्यासाठी सर्वानुमते मान्यता प्रदान करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येते.

**सुचक** :- बापूराव गजभारे                                        **अनुमोदक** :- दयानंद वाघमारे

**विषय क्रं. 09**                                        **प्रस्ताव**

महाराष्ट्र शासना तर्फे महात्मा फुले आरोग्यदायी योजना सर्व शासकीय रुग्णालय, निमशासकीय रुग्णालय व खाजगी दवाखान्यात राबविण्यात येत आहे.

मनपाकेच्या हैदरबाग दवाखान्यात सुध्दा महात्मा फुले आरोग्यदायी योजना लागू करणे करिता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व मा. आयुक्त यांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक** :- म. मसुद अहेमद खान उस्मान खान                                        **अनुमोदक** :- स. शेर अली महेबुब अली

**विषय क्रं. 10**                                        **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील विविध प्रभागात स. सदस्यांच्या मागणीनुसार शासनाच्या विविध योजने अंतर्गत निधी प्राप्त करुन विकासाचे कामे करण्यासाठी शासनास शिफारस करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- आनंद चव्हाण                                        **अनुमोदक** :- तेहरा अमितसिंह

**विषय क्रं. 11**                                        **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील विविध प्रभागाचे सर्वेक्षण करुन आवश्यक्ते नुसार अंगणवाडी सुरु करण्यासाठी शिफारस करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- तेहरा अमितसिंह                                        **अनुमोदक** :- आनंद चव्हाण

**विषय क्रं. 12**                                        **प्रस्ताव**

नांदेड शहरातील पाटबंधारे विभाग नांदेड यांनी विष्णुपूरी बंधारा ते आमदुरा बंधारा पर्यंत गांदावरी नदीच्या दोन्ही तिरावरील निळा व लाल पुररेषा पुरपातळी बाबत दिनांक 23.11.2020 रोजी कळविलेले आहे. त्याअनुषंगाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड शहरात बांधकाम विषयक व इतर विकासाची कामे करण्यात येतात त्याकरिता उक्त पत्रात नमुद केल्याप्रमाणे महापालिका हद्दी अंतर्गत येणा-या क्षेत्रासाठी प्रमाणित नकाशाची आवश्यक्ता आहे असे कळविले होते परंतु आज पर्यंत सदरा माहिती अप्राप्त आहे.

या कार्यालया तर्फे मनपा हद्यीतील भुखंडधारक / इमारतधारक यांना बांधकाम परवानगी देण्यात येते व सदर रेषामध्ये होणा-या नागरीकांचा याबाबत तक्रारी येत असुन याअनुषंगाने शासकीय कामा करिता उक्त

पुरपातळी रेषा बाबत प्रमाणित नकाशाची प्रत पुरविण्यात यावी. जेणे करुन पडताळणी करुन विकास कामा बाबत निर्णय घेता येईल. सुधारीत नांदेडशहर विकास योजना नुसार न्युनतम पुररेषा पातळी 354.00 व उच्चतम पुररेषा पातळी 356.70 दर्शविण्यात आली आहे. पाटबअंधारे यांच्या पत्रान्वये अनुक्रमे निळी व लाल पुररेषा 358.90 व 361.00 ही पातळी पुर्वी पेक्षा 4.90 व 4.30 जास्त दर्शविण्यात आली आहे. तसेच त्यानुसार अस्तित्वातील घरे सुध्दा पुररेषे खाली जाण्याची शक्यता आहे. नांदेड शहरातील गजवलेले बरेच भाग उच्चतम पुररेषा पातळीत येतात. परंतु स्थानिक जेष्ठ नागरीकांच्या म्हणण्यानुसार उच्चतम पुररेषा पातळी दर्शविलेल्या भागात आज पर्यंत कधीच पुराचे पाणी आल्याचे आढळुन येत नाही. त्यामुळे सदर पुररेषा पातळीचे महानगरपालिके मार्फत पुनर सर्व्हेक्षण करुन व तसेच स्थानिक जेष्ठनागरीकांच्या मदतीने पुररेषा पातळी ठरविण्यात यावी. या कामाकरिता मनपाकेच्या सर्व्हेअर इंजिनीयरची नियुक्ती व सर्व्हेक्षण करण्याकरिता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- शोऐब आफाख स. मजहर हुसेन **अनुमोदक** :- अ. हफीज अ. करीम

**विषय क्रं. 13** **प्रस्ताव**

दिनांक 30.09.2020 च्या सर्वसाधारण सभेत पुढील प्रमाणे विषय ठेवण्यात आला होता तथापि सदरची सभा दिनांक 26.10.2020 रोजी पार पाडण्यात आलेली असुन त्यानुसार ठराव क्रं. 117 अन्वये पारीत करण्यात आलेला आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील क्षेत्रीय कार्यालय क्रं. 04 अंतर्गत आर्थीक वर्ष 2018-19 व 2019-20 मध्ये वजिराबाद भागातील पाणी पुरवठाचे AMRC अंतर्गत निविदा प्रक्रिया पुर्ण झालेल्या कामाची मा. आयुक्तांनी दिलेल्या मान्यतेसह कामाची यादी नावासहीत त्या यादी मधील किती कामे पुर्ण झाली व कोण कोणते कामे कारणमुळे शिल्लक आहे झालेल्या कामाचे खर्च याची सविस्तर माहिती सर्वसाधारण सभेपुढे सादर करुण त्यावर चर्चा करुन निर्णय घेण्यास सादर करण्यात आला होता.

त्यानुसार मनपा सर्वसाधारण सभा दिनांक 26.10.2020 रोजी ठराव क्रं 117 अन्वये खालील प्रमाणे पारीत करण्यात आलेला आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील क्षेत्रीय कार्यालय क्रं. 04 अंतर्गत आर्थीक वर्ष 2018-19 व 2019-20 मध्ये वजिराबाद भागातील पाणी पुरवठाचे AMRC अंतर्गत निविदा प्रक्रिया पुर्ण झालेल्या कामाची मा. आयुक्तांनी दिलेल्या मान्यतेसह कामाची यादी नावासहीत त्या यादी मधील किती कामे पुर्ण झाली व कोण कोणते कामे कारणमुळे शिल्लक आहे झालेल्या कामाचे खर्च याची सविस्तर माहिती सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. तथापि संबंधीत विभागाने सभा होई पर्यंत माहिती सादर केलेली नाही त्यामुळे संबंधीत विभाग प्रमुखांनी सदरची लेखी माहिती 07 दिवसात तयार करुन सर्व स. सदस्यांना देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

उक्त ठरावाच्या अनुषंगाने सदरची माहिती 07 दिवसाचे आत सर्व स. सदस्यांना देण्याचे पारीत केल्यानुसार सदरचा ठराव नगरसचिव विभागा मार्फत दिनांक 05.01.2021 रोजी पाणी पुरवठा विभागास पाठविण्यात आले होते.

तथापि कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी दिनांक 09.02.2021 पर्यंत उक्त माहिती दिलेली नसल्यामुळे संबंधीत अधिकारी हे महासभेच्या निर्णयाची अमलबजावणी न केल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंग विषयक कार्यवाही तात्काळ करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- शोऐब हुसेन स. मजहर हुसेन **अनुमोदक** :- अ. शमीम अब्दुल्ला

**स्वाक्षरीत/-**

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)** **( स. अजीतपालसिंघ संधू )**

**नगरसचिव,**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड